# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ


दूरध्वनी क्र. २४०१०४३७/
२४०२०७८१/२४०१४७०१
फॅक्स क्र. : २४०२४०६८
*Visit us at* : http://mpcb.gov.in
Email:eb@mpcb.gov.in

कल्पतरु पॉईंट, २ रा मजला,
सायन माटुंगा स्किम रोड क्र.८,
सायन सर्कलसमोर,सायन (पूर्व))
मुंबई ४०० ०२२


जा.क्र.मप्रनि/आस्था/ बी ८४८

दिनांक ३०/०६/२०१७

## प रि प त्र क

विषयः प्रदूषणाबद्दल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत केल्या जाणाऱ्या कार्यवाहीची माहिती सार्वजनिक क्षेत्रास माहिती होण्याबाबत

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (a) (iv) नुसार जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात येत आहेत की, प्रदूषणाबद्दल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत केल्या जाणाऱ्या कार्यवाहीची माहिती सार्वजनिक क्षेत्रात असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सर्व क्षेत्रीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर व मूळ कार्यालयाच्या संकेतस्थळावर व जिल्हानिहाय सूचना फलकावर / संकेतस्थळावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ (२,३,४) प्रमाणे खालील माहिती प्रकट करण्यात यावी.

१. जानेवारी २०१७ पासून प्रतिमाह (तारीख निहाय) संमतीपत्र दिलेल्या कारखान्यांची नावे, पत्ते, उद्योगांचा संक्षिप्त तपशील, प्रदूषण नियंत्रणाच्या संदर्भात (तारीख निहाय) नूतनीकरणासाठी अर्ज केलेल्या कारखान्यांची नावे, नूतनीकरण दिलेल्या कारखान्याचे नाव, अर्ज प्रलंबित असल्याची कारणे

२. ज्या कारखान्यांविरुध्द तक्रार प्राप्त झाली आहे, त्याचा थोडक्यात तपशील व सदर तक्रारींतील चौकशीचे निष्कर्ष आणि त्या अनुषंगाने केलेल्या कारवाईची माहिती

३. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत ज्या कार्यालयांची मासिक तपासणी केलेली आहे, त्या कारखान्यांचा तपशील व त्यांच्याविरुध्द नोंदविलेल्या त्रुटी पूर्ण झाल्या की नाही याचा तपशील व त्रुटी पूर्ण झाल्या नसतील तर त्यांच्यावर केलेल्या कार्यवाहीचा थोडक्यात तपशील

४. प्रत्येक क्षेत्राचा वरील क्र. १ ते ३ पर्यंतचा तपशील जिल्हा व तालुकानिहाय कार्यालयात सूचना फलकावर ३ महिन्याच्या आत प्रदर्शित करण्यात यावे.

५. सदर संमतीपत्र देण्याची प्रक्रिया (online) ऑनलाईन नसेल तर ती (online) ऑनलाईन करण्याची कार्यवाही त्वरीत सुरु करावी.

६. वरील क्र. १ ते ३ च्या माहितीचा Archival Data सुध्दा ६ महिन्यांच्या आत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा.

उपरोक्त परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करावयाचे आहे.

(पी. अन्बलगन, भा.प्र.से.)
सदस्य सचिव

प्रति,
१. प्रधान वैज्ञानिक अधिकारी/ हवा प्रदूषण निवारण अभियंता/ जल प्रदूषण निवारण अभियंता
२. सहायक सचिव (तांत्रिक)/मुख्य लेखा अधिकारी/ विधी अधिकारी.

३. कार्यकारी अभियंता/प्रादेशिक अधिकारी, मुख्यालय/सांख्यिकी अधिकारी/ प्रशासकीय अधिकारी
४. वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी, मध्यवर्ती प्रयोगशाळा, महापे, नवी मुंबई/नागपूर
५. प्रादेशिक अधिकारी-मुंबई/ठाणे/कल्याण/रायगड/नवीमुंबई/पूणे/नशिक/नागपूर/औरंगाबाद/कोल्हापूर/अमरावती/चंद्रपूर.
६. उप-प्रादेशिक अधिकारी-मुंबई-१/मुंबई-२/मुंबई-३/मुंबई-४/ठाणे-१/ठाणे-२/तारापूर-१/तारापूर-२/नवी मुंबई-१/नवीमुंबई-२/तळोजा/कल्याण-१/कल्याण-२/कल्याण-३/भिवंडी/रायगड-१/रायगड-२/महाड/कोल्हापूर/सांगली/रत्नागिरी/चिपळूण/पूणे-१/पूणे-२/पिंपरी-चिंचवड/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/जालना/नांदेड/नाशिक/अहमदनगर/जळगाव/धुळे/नागपूर-१/नागपूर-२/भंडारा/चंद्रपूर/अमरावती-१/अमरावती-२/अकोला/परभणी/लातूर/चंद्रपूर
७. संकेतस्थळ, पर्यावरण माहिती केंद्र, म. प्र. नि. मंडळ, मुंबई/परिपत्रक नस्ती २०१७